**कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना**

**टोल फ्री क्रमांक - १०६४**

**कार्यालय दुरध्वनी क्र :- ०२४८२-२२०२५२**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- ०१.०९.२०२१.**

**ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, कार्यालय अंतर्गत जि.प.जालना येथील उप अभियंता श्री. दामोदर पांडुरंग घोरपडे यांना ग्रामपंचायत अंतर्गत नळ कनेक्शन जोडणी व पाईप लाईन दुरुस्तीचे एम बी तयार करुन ७,४०,०००/- रुपयांचे बील मंजुर करण्यासाठी ७५,०००/- रुपयांचे लाचेची मागणी करुन पहीला हप्ता म्हणुन १०,०००/- रुपये लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री. दामोदर पांडुरंग घोरपडे वय ५३ वर्ष व्यवसाय नोकरी शाखा अभियंता, (उप अभियंता प्रभारी) ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, कार्यालय जालना अंतर्गत जि.प.जालना रा. जि प क्वार्टर मोतीबागेजवळ जालना जि. जालना (वर्ग - २ ) |
| २ | गुन्हा घ ता व ठीकाण | :- | दि- ०१.०९.२०२१ रोजी पंचायत समिती कार्यालय आवारात जालना, जि. जालना येथे |
| ३ | लाच स्विकारली रक्कम | :- | १०,०००/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार हे सरपंच असुन त्यांचे गावाला ग्रामपंचायत अंतर्गत वैयक्तीक नळ कनेक्शन जोडणी व नवीन पाईप लाईन आर ओ जोडणी व जुनी पाईप लाईनचे दुरुस्ती करण्याचे एम बी तयार करुन त्यांचे ७,४०,०००/- रुपये बील मंजुर करण्यासाठी अर्ज केला होता. त्यावरुन ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, कार्यालय जालना येथील उप अभियंता श्री. दामोदर पांडुरंग घोरपडे यांनी सदरचे बीलाचे एम बी तयार करुन बील मंजुर करण्यासाठी १०,०००/- रुपये तक्रारदार यांचेकडुन घेतले होते, तसेच पुन्हा तक्रारदार यांचे काम करुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ७५,०००/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदारास उप अभियंता श्री. दामोदर पांडुरंग घोरपडे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरून दि. ०१.०९.२०२१ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता उप अभियंता श्री. दामोदर पांडुरंग घोरपडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे ग्रामपंचायत अंतर्गत वैयक्तीक नळ कनेक्शन जोडणी व नवीन पाईप लाईन आर ओ जोडणी व जुनी पाईप लाईनचे दुरुस्ती करण्याचे एम बी तयार करुन त्यांचे ७,४०,०००/- रुपये बील मंजुर करुन देण्यासाठी ७५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन पहीला हप्ता म्हणुन १०,०००/- रुपये लगेच स्विकारणार असल्याचे निष्पण्ण झाल्याने तसेच टरल्याप्रमाणे उप अभियंता श्री. दामोदर पांडुरंग घोरपडे यांनी तक्रारदार यांना ७५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन त्यांचेकडुन पहीला हप्ता म्हणुन १०,०००/- रुपयांची लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने पंचायत समिती कार्यालय जालनाचे आवारात पकडले आहे.

लोकसेवक श्री. दामोदर पांडुरंग घोरपडे वय ५३ वर्ष व्यवसाय नोकरी शाखा अभियंता,(उप अभियंता प्रभारी) ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, कार्यालय जालना अंतर्गत जि.प.जालना रा. जि प क्वार्टर मोतीबागेजवळ जालना जि. जालना यांचे विरुध्द पोलीस ठाणे कदीम जालना जि. जालना येथे गुन्हा दाखल करणेबाबत कार्यवाही चालु आहे.

**तसेच अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. ८९७५७६२९०६, पोलीस निरीक्षक मो.नं. ८३९०७५७८३५, ९८२३२१६७८८ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
ला प्र वि, जालना.